# धरा अंतरीची वाट



कोण कुठला विषाणू
रोज सतावतो आहे
नाही कुणाचा भरोसा
जाई कुणी कोण राहे

वाटा मोकळया जाहल्या
चालायला कुणी नाही
रस्ता उजाड उजाड
धावायला कुणी नाही

पायवाटा झोपलेल्या
रस्ते ताणून दिलेले
कुणी येता अवचित
कावलेले त्रासलेले

कुठे गेली ही माणसें
सदा तुडवीत होती
कुणा कुणाच्या नावाने
उर बडवत होती

रानांमधली श्वापदे
झाली होती रानबंद
हमरस्ता चालती
नाही त्यांना हो निर्बंध

जिणे मानवाचे आता
किती कठीण जाहले
कसे खुराड्याच्या आत
बंदीवान जाहलेले

धरा अंतरीची वाट
मन कधीचे साचले
करा आतला प्रवास
असे अथांग व्यापले

**- नरेंद्र प्रभू**
http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/